डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
**कृषि संशोधन केंद्र,**
**तारसा, तालुका-मौदा, जि.नागपूर-४४११०६**

डॉ.वि.कि.बिरादार,
प्रभारी अधिकारी

E-mail(O) : arstharsa@pdkv.ac.in
E-mail(O) : arstharsa1910@gmail.com

जा.क्र./कृसंके /जिर्ण.इ. /४३१/२०२५ दिनांक -२६.१२.२०२५

## निविदा सुचना (३ री वेळ)

कृषि संशोधन केंद्र, तारसा ता. मौदा जि. नागपूर येथील प्रक्षेत्रावरील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मोडकळीस आलेल्या इमारती जसे मजुर क्वार्टर, गोडावून इ. पूर्णत: जिर्ण झालेल्या इमारती पाडून त्यामधून निघणारा मलबा, सागाच्या बल्ल्या, फळया, जुने दरवाजे, इमारतीमधील लोहा, इत्यादी सामानाची **निविदा पध्दतीने (३ री वेळ) विक्री करावयाची आहे.**

**तक्ता क्र.१:** मोडकळीस आलेल्या पाडावयाच्या इमारतींची यादी

| अ.क्र. | इमारतीचे नाव | इमारतीचे मोजमाप | इमारतीचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | गोडावून क्र.१ | २०.५० x ६.३० मी. | १२९.१५ चौ.मी. |
| २ | गोठा | २०.५० x ६.३० मी. | १२९.१५ चौ.मी. |
| ३ | गोडावून क्र.२ | १२.८० x ६.३० मी. | ८०.६४ चौ.मी. |
| ४ | गोडावून क्र.३ | २७.०० x ६.३० मी. | १७०.१० चौ.मी. |
| ५ | A लोखंडी टाकी, (B विटाचे पिल्लर) | ६ x १.२० x ०.४५ | १ नग (६ नग) |
| ६ | निवासस्थाने क्र.१ ते क्र.७ | १ x ६०.०० x ७.०० मी. | ४२०.०० चौ.मी. |
| ७ | शौचालय | २ x ३.५० x २.०० मी. | १४.०० चौ.मी. |
| ८ | कॅनल लगतचे निवासस्थान | २ x १२.५० x ११.३० मी. | २८२.५० चौ.मी. |
| ९ | NARP निवासस्थाने समोरील व मागील बाजु | ३ x १३.१० x ९.०० मी. | ३५३.७० चौ.मी. |
| १० | अतिथीगृह | १ x १६.०० x ६.३० मी. | १००.८० चौ.मी. |
| ११ | शौचालय | २ x ३.५० x २.०० मी. | १४.०० चौ.मी. |
| १२ | एनएआरपी कार्यालय | १ x १८.२५ x १४.०० मी. | २५५.५० चौ.मी. |
| १३ | प्रक्षेत्र क्र.१ मधील शेड | २ x १७.०० x ५.०० मी. | १७०.०० चौ.मी. |
| १४ | चौकी क्र.१ | १ x १०.३० x ९.१५ मी. | ९४.२५ चौ.मी. |
| १५ | चौकी क्र.२ | १ x ६.०० x ३.५० मी. | २१.०० चौ.मी. |
| १६ | प्रक्षेत्र क्र.११ मधील इमारत | १ x ८.०० x ४.५ मी. | ३६.०० चौ.मी. |

### निविदा संदर्भात नियम व अटी

१. सोबतच्या प्रपत्रात मोहोरबंद पाकिटामध्ये निविदा दिनांक: **०६.०१.२०२६** रोजी **दुपारी ०२.०० वाजेपर्यंत** मागविण्यात येत आहेत. त्यासाठी **रू.२००००/- अनामत रकमेचा** राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनादेश (Demand Draft) 'Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth' या नावाने निविदेसोबत जमा करावा. अन्यथा निविदा रद्द समजण्यात येईल.
२. निविदा प्रपत्र रू.१०००/- + (१८ टक्के जीएसटी) एकुण रू.१११८/- नगदी स्वरूपात कार्यालयात जमा केल्यानंतर निविदा प्रपत्र पुरविण्यात येईल.
३. मंजुर निविदा धारकाने कार्यालयीन संपर्क केल्यानंतर प्रस्तावित निविदा रकमेच्या **२५ टक्के** रक्कम ०३ दिवसापर्यंत कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. त्यांनतर ७ दिवसाच्या आत शिल्लक रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतर कामाला सुरुवात करून ३० दिवसामध्ये काम पुर्ण करावे लागेल. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदर आदेश रद्द होवून कार्यालयात जमा केलेली कोणतीही रक्कम परत मिळणार नाही.
४. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर नामंजूर निविदा धारकांने कार्यालयास अर्ज केल्यानंतर १० दिवसाचे आत अनामत रकमेचा मागणी धनादेश (Demand Draft) परत घ्यावा.
५. तक्ता क्र.१ मध्ये नमुद सर्व जिर्णावस्थेत/मोडकळीस आलेल्या इमारती पुर्णत: पाडून (Demolish) जमिनीलगत समतल करणे.
६. त्यामधून निघणारा मलबा लाकूड फाटा, जुने दरवाजे, इमारतीमधील लोहा, इत्यादी सामानाची विल्हेवाट लावणे व मलबा ग्रामपंचायत हद्दीच्या बाहेर फेकणे.
७. इच्छुक निविदा धारकांना नमुद सर्व जिर्णावस्थेत/मोडकळीस आलेल्या इमारती कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते ४.०० पर्यंत दिनांक २६.१२.२०२५ ते ०५.०१.२०२६ या कालावधीमध्ये पाहता येईल. कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी पाहणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.
८. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र,तारसा हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

26.12.25
प्रभारी अधिकारी
प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन केंद्र
तारसा, जि. नागपूर